**क्रमांक : १४७७(२)/२०१९/१४-अ.** **दिनांक : १४ जानेवारी, २०२०.**

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१९

**(जाहिरात क्रमांक ७/२०१९)**

## घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या **राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१९** च्या लेखी परीक्षेचा निकाल दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी जाहीर करण्यात आला आहे. **मुलाखतीचा कार्यक्रम लवकरच आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेत स्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येत आहे.**

२. लेखी परीक्षेद्वारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या सर्व उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेच्या अधिसूचनेत अधिसूचित केलेल्या पदांसाठी पसंतीक्रम (Preference Number) त्यांच्या प्रोफाईलमध्ये ऑनलाईन पध्दतीने लिंक ओपन झाल्यापासून **सहा** दिवसांच्या आत पाठविणे आवश्यक आहे. केवळ ऑनलाईन पध्दतीने भरलेले पसंतीक्रम विचारात घेण्यात येतील. अन्यथा अधिसूचनेत ज्या क्रमाने पदे नमूद करण्यात आली आहेत, तोच पसंतीक्रम अशा उमेदवारांकरिता गृहित धरला जाईल व तद्नंतर याबाबत उमेदवारांची कोणतीही निवेदने / पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

३. प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, लेखी परीक्षेच्या निकालाआधारे मुलाखतीकरिता प्रवेश देण्यात येत आहे. या तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १४ जानेवारी, २०२०**

**उप सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.**